महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : agmhrom@gmail.com
दूरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
website :www.mahadiscom.in
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५०६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.८९५/१६०४३ दिनांक : १४.०७.२०२१

**प्रति,**
**प्रादेशिक संचालक**
**म.रा.वि.वि.कं.मर्या.**
**प्रादेशिक कार्यालय, पुणे.**

**विषय: तंत्रज्ञ ते वरिष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्तीकरीता ग्राहय धरण्यात येणाऱ्या निकषामध्ये क्षेत्रीय कार्यालयात असणारी तफावत दूर करण्याबाबत.**

**संदर्भ:** १.प्रासं/पुणे/मासं/०६२४ दि.१४.०६.२०२१.
२.मासंवि/रवका/न.क्र.९/२९४९ दि.०९.०२.२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन, क्षेत्रीय कार्यालयांकडून विभागस्तरावर तंत्रज्ञ ते वरीष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्तीकरीता निवड करतेवेळी शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादीबाबत विभागनिहाय वेगवेगळे निकष लागू केले जात असल्याचे सांघिक कार्यालयाच्या निदर्शनास आलेले आहे. वरिल संदर्भीय पत्र क्र.१ मध्ये नमुद केल्या नुसार सातारा मंडलांतर्गत फलटण विभागामध्ये अनुकंपा तत्वांतर्गत कंपनी पुरस्कृत आयटीआय (तारतंत्री) हा अभ्यासक्रम पूर्ण करुन तंत्रज्ञ (विद्युत सहाय्यक पदावरील ३ वर्षाचा कंत्राटी कालावधी पूर्ण करुन) पदावर रुजू झाले आहेत, अशा तंत्रज्ञांची वरीष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्नतीसाठी निवड करतेवेळी त्यांना अर्हतारहीत समजून, अशा तंत्रज्ञांचा तीन वर्षाचा अनुभव ग्राहय धरुन त्यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

२. याबाबत आपणास कळविण्यात येते की, मराविविकंम, वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ मधील विनियम क्र. ५ आणि ८ अनुसूची - क (१) या तरतुदी अंतर्गत अर्हताप्राप्त तंत्रज्ञांकरीता वरिष्ठ तंत्रज्ञ पदावर पदोन्नती साठी २ वर्षाचा निकटतम निम्न पदाचा अनुभव असणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे अर्हतारहीत तंत्रज्ञांकरीता वरिष्ठ तंत्रज्ञ पदावर पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच, **मराविविकंम, वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम - २००५ मधील विनियम क्र. २२ क (क) नुसार प्रत्येक पदा करीता पदोन्नती साठी २ वर्षाचा निकटतम निम्न पदाचा अनुभव असणे आवश्यक आहे.** तंत्रज्ञ पदावर कार्यरत कर्मचाऱ्याने नियमित पदावर रुजू होण्यापूर्वी विद्युत सहाय्यक अथवा वीजसेवक या कंत्राटी पदावर केलेल्या कामाचा अनुभव हा संबंधित संवर्गातील तसेच तो आपल्याच कंपनीतील अनुभव असल्याने तो पदोन्नतीसाठी ग्राहय धरणे आवश्यक आहे. सबब, तंत्रज्ञ ते वरीष्ठ तंत्रज्ञ पदी पदोन्नती देत असतांना लागू करण्यात येणाऱ्या निकषांमधील तफावत दूर करण्याच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.



Scanned with CamScanner

अ) सा.आ.१५९ (क) दि.३०.०६.२००४ मधील तरतुदीनुसार कंपनी पुरस्कृत आयटीआय (तारतंत्री) अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करुन तंत्रज्ञ (विद्युत सहाय्यक) पदी रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा तंत्रज्ञ या नियमित पदावरील २ वर्षांचा कालावधी आणि विद्युत सहाय्यक पदावरील १ वर्षांचा कालावधी हा एकत्रित अनुभव समजून त्यांना वरीष्ठ तंत्रज्ञ पदावर पदोन्नती देण्यात यावी.

ब) अर्हतारहीत वीजसेवकांपैकी ४/५ वर्षाचा कंत्राटी कालावधी पूर्ण करुन तंत्रज्ञ पदी रुजू झालेले कर्मचारी यांनी तंत्रज्ञ पदावर दोन वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर सदरचा कालावधी व त्यांचा वीजसेवक पदावरील कालावधी हा एकत्रित अनुभव समजुन त्यांना वरीष्ठ तंत्रज्ञ पदावर पदोन्नती देण्यात यावी.

३. सबब, तंत्रज्ञ ते वरिष्ठ तंत्रज्ञ पदावरील पदोन्तीकरीता ग्राहय धरण्यात येणाऱ्या निकषाबाबत क्षेत्रीय कार्यालयांमध्ये असणारी तफावत दूर करण्याबाबत वरील सूचना अंगीकृत करण्यात याव्यात.

(कमांडर शिवाजी इंदलकर)(से.नि.)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)(अ.का.)

**प्रत सविनय सादर:**

१. सहा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद / कोकण (कल्याण).
२. संचालक (संचलन/मासं), म.रा.वि.वि.कं.मर्या., ६ वा मजला, प्रकाशगड, बांद्रा, मुंबई.
३. प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या., प्रादेशिक कार्यालय, नागपूर.

**प्रत माहितीसाठी सस्नेह रवाना:**

सर्व मुख्य अभियंता, परिमंडळ कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या.

D:\Old Data\O&M 01.07.2017\F-895 CS-28\Letter\Jr. Tech to Sr. Tech Promotion Guideline'.docx

CS Scanned with CamScanner